(39)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
# आणि
# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
# यांच्यात ज्ञानमंडळ स्थापन करण्यासाठी करावयाचा करार

विषय - भूविज्ञान

करार करून देणार -
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
मार्डी रोड, तपोवन जवळ, अमरावती - ४४४६०२.
फोन नं. ०७२१- २६६२१७३.
ई-मेल - reg@sgbau.ac.in

करार करून घेणार -
सचिव,
महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,
रविंद्र नाट्यमंदिर इमारत, २ रा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.
दूरध्वनी//फॅक्सक्र. ०२२-२४२२९०२०, ०२२-२४२२९०२७.
ई-मेल - sec.ms.mvkosh@gmail.com

## प्रकल्पाचे नाव - मराठी विश्वकोश अद्ययावतीकरण

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना दि. १९ नोव्हेंबर १९६० रोजी झाली. त्यानंतर मंडळाचे विभाजन होऊन स्वतंत्र 'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ' हे महाराष्ट्र शासनाने दि. १ डिसेंबर १९८० रोजी स्थापन केलेले मंडळ असून विश्वकोशाच्या द्वारा जगातील विविध विषयातील ज्ञान मराठीत आणण्यासाठी या मंडळाची स्थापना झाली. आपला उद्देश अधिक परिणामकारक रीत्या साध्य करण्यासाठी विविध विद्यापीठांना ज्ञानमंडळाच्याद्वारे सहभागी करून घेण्याकरिता विविध विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेतला आहे.

विश्वकोश मंडळाने आपल्या कार्यासाठी विविध विद्यापीठांचे सहकार्य घ्यावे असे निर्देश महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १७ जून १९६४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केले आहे.

त्याचबरोबर विद्यापीठाच्या दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ विद्यापीठांच्या दैनंदिन कामकाजाव्यतिरिक्त पुढील उद्देश नमूद केले आहेत :

५) to extend the benefits of knowledge and skills for development of individuals and society by associating the university closely with local and regional problems of development.

६) to carry out social responsibility as an informed and objective critic, to identify and cultivate talent, to train the right kind of leadership in all walks of life and to held younger generation to develop right attitudes, interests, values.

९) to promote acquisition of knowledge in a rapidly developing and changing society and to continually offer opportunities of upgrading knowledge, training and skills in the context of innovations, research and discovery in all fields of human endeavor by developing higher educational network with use of modern communication media and technologies appropriate for a learning society.

१५) to strive to promote competitive merit and excellence as the sole guiding criterion in all academic and other matter relating to students.

Along with these in the section of Powers and Duties of Universities it is clearly mentions in point no. 55 which runs like this -

५५) to promote by itself, or in co-operation with other universities the study of Marathi and the use of Marathi as a medium of instruction, study, research and examination.

तसेच, मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी ज्ञानमंडळे स्थापन करण्यास मान्यता देणेबाबत महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र. विकोश २०१५/ प्र.क्र. १७१ / भाषा-२, दि. २३ फेब्रुवारी २०१६ नुसार व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या मान्यतेने सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ आणि कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्यात सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश** - मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने विश्वकोशाच्या २० खंडांची निर्मिती केली असून या २० खंडांच्या नोंदींचे अद्ययावतीकरण करणे, विविध विषयावरील नव्या माहितीची सातत्याने भर टाकणे यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना परिशिष्ट -१ नुसार करणे. प्रत्येक उपविषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ स्थापन करून ही सर्व ज्ञानमंडळे एकमेकांशी जोडणे व त्या आधारावर विश्वकोशाची पुढील रचना करणे हा उद्देश आहे.